सुरक्षा रक्षक मंडळे/माथाडी मंडळे या मंडळांत आर्थिक बाबींशी संबंधित प्रकरणी शासनाची मान्यता घेण्यासंदर्भातील अट शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्र. युडब्ल्युए-२०१४/प्र.क्र. ५८३/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१७.

वाचा : १) शासन आदेश क्रमांक : एसजीए-१५०९/प्र.क्र.१७५८/कामगार-५, दि. २५.०१.२०१०.
२) शासन आदेश क्रमांक : युडब्ल्युए-२०१४/प्र.क्र.५८३/कामगार-५, दि. ४.१२.२०१४.

आदेश

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत राज्यात एकूण ३७ माथाडी मंडळे व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत राज्यात एकूण १५ सुरक्षा रक्षक मंडळांची स्थापना करण्यात आलेली आहे.

माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांत त्रिपक्षीय मंडळ अस्तित्वात नसल्याने, कार्यरत असलेल्या एक सदस्यीय मंडळांनी, प्रशासकीय प्रयोजनांव्यतिरिक्त काही आवश्यक खरेदी करावयाची झाल्यास, तसेच आर्थिक बाबींशी निगडीत धोरणात्मक बाबींबाबत काही निर्णय घ्यावयाचे झाल्यास अथवा आर्थिक बाबींशी निगडीत निविदा प्रक्रिया राबवावयाची झाल्यास अशी कार्यवाही करण्यापूर्वी त्यास शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील असे दि. २५.०१.२०१० व दि. ४.१२.२०१४ रोजीच्या शासन आदेशान्वये सुचित करण्यात आले आहे. यामुळे माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळांच्या दैनंदिन प्रशासकीय व वैधानिक कामकाज करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ व महाराष्ट्र सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ मधील तरतूदींची व त्याअंतर्गत योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम मंडळामार्फत होणे आवश्यक असल्यामुळे, वरील शासन आदेशामध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले होते. या संदर्भात दि. ६.७.२०१७ रोजीच्या महाराष्ट्र माथाडी सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये देखील वरील आदेश शासनाकडून रद्द करण्यात यावेत, तसेच मंडळांनी सर्व खरेदी मंडळाच्या स्तरावर शासनाच्या धोरणानुसार करावी अशी समितीने शिफारस केली आहे. माथाडी/सुरक्षा रक्षक मंडळांना शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नसल्यामुळे व माथाडी तसेच सुरक्षा रक्षक अधिनियमातील व या अधिनियमांतर्गत मंडळांना लागू करण्यात आलेल्या योजनेमधील विहीत

तरतूदीनुसार प्राप्त वैधानिक प्राधिकारांतर्गत मंडळाचे कार्य व योजनेची अंमलबजावणी करणे सुसह्य होणे आवश्यक असल्यामुळे दि. ४.१२.२०१४ रोजीच्या आदेशामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

(अ) माथाडी/सुरक्षा रक्षक मंडळांकरीता प्रशासकीय प्रयोजनाव्यतिरिक्त वेतन व इतर भत्ते तसेच मंडळाचे दैनंदिन प्रशासकीय व वैधानिक कामकाज करताना आवश्यक ती कार्यालयीन खरेदी व नियमित होणारा कर्यालयीन खर्च, महाराष्ट्र शासनाचे कार्यालयीन खरेदी विषयी धोरण मार्गदर्शक मानून व त्याच्याशी सुसंगत राहून त्याचप्रमाणे या संबंधित अधिनियम/नियम/शासन निर्णय/परिपत्रकामधील तरतूदींचे काटेकोर पालन करुन आवश्यक त्या खरेदीसंदर्भात कामगार आयुक्त यांना नियमानुसार निर्णय घेण्यास अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

(ब) तथापि, या व्यतिरिक्त मंडळाच्या कामकाजाकरीता नव्याने योजना सुरु करावयाची झाल्यास अथवा वरील प्रयोजनाव्यतिरिक्त आवश्यक खरेदी करावयाचा निर्णय घ्यावयाचा झाल्यास, तसेच आर्थिक बाबीशी निगडीत धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा झाल्यास, त्यानुसार त्या योजनेचा आवश्यक तो प्रकल्प अहवाल व खर्चासंबधीचा सविस्तर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(क) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग ।।।/उद्योग-४, दि. १.१२.२०१६ अन्वये शासनाने निश्चित केलेली खरेदी प्रक्रिया राबविणे बंधनकारक राहील. शासनाने वेळोवेळी या संबंधी निर्गमित केलेल्या आदेशांचे/निर्देशांचे अनुपालन करणे कामगार आयुक्त व सर्व संबंधितांना बंधनकारक राहील.

(ड) या संबंधातील आर्थिक बाबींचे कोणतेही दायित्व शासनावर राहणार नाही.

सदरहू आदेश महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ७(४), तसेच महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये शासनास असलेल्या प्राधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदरहू आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता कामगार आयुक्त व सर्व संबंधितांनी घ्यावी.

सदरहू आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१७०९१११२२३१९५११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Mandar Karnik
Date: 2017.09.11 16:48:13 +05'30'

(मं.र. कर्णिक)
उप सचिव (कामगार)

प्रत :-

१) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सह आयुक्त कामगार, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे.
४) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळे.
५) निवड नस्ती (कामगार-५).